**क्रमांक : ०२**

**महाराष्ट्र विधानपरिषद**
**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२४/ माघ १६, १९४५ (शके)**

**०२.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे तृतीय (हिवाळी) अधिवेशन बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ पर्यंत घेण्याचे निश्चित करण्यात आले होते.

त्यानुषंगाने मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरिता गट क्र. ४ चे दिनांक २१ डिसेंबर, २०२३ व गट क्र. ५ चे दिनांक २२ डिसेंबर, २०२३ रोजीचे विभागाकडे पाठविलेले सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. सदर दोन दिवसांचे उर्वरित प्रश्न तसेच जादा आठवड्याकरिता घेण्यात आलेले तारांकित प्रश्न तसेच अर्धा-तास चर्चेच्या (सर्वसाधारण/प्रश्नातून उद्‌भवणारी) सूचनांपैकी सभागृहात चर्चा झालेल्या आणि दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविलेल्या **तथापि, पुढे ढकलण्यात आलेल्या २ अर्धा-तास चर्चेच्या सूचनांव्यतिरिक्त** अन्य स्वीकृत अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सर्वसाधारण/प्रश्नातून उद्‌भवणारी) व्यपगत करण्यात आल्या आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : ५ फेब्रुवारी, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (१) कार्यभार**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

**याची प्रत :**
**(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.**
**(२) संगणक कक्ष वेबसाईट**
**(३) MKCL**